# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# अजित पवार महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे 'आका'

## स्वतःच्या लेकाचे पराक्रम पहा; भाजपा आमदार लांडगेंचा हल्ला, पार्थ पवारांवरून डिवचले

**पिंपरी | प्रतिनीधी**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत स्वबळावर लढत असलेल्या भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या घमासान सुरू आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन्ही महापालिकांमध्ये भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून भाजपा आणि स्थानिक नेत्यांना घेरले. त्यामुळे भाजपाचे नेतेही अजित पवारांवर तुटून पडताना दिसत आहेत. अजित पवारांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना भाजपाचे आमदार महेश लांडगे चांगलेच संतापले. अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका आहेत, असा घणाघात लांडगेंनी केला.





अजित पवारांनी पिंपरी चिंचवड येथील सभेत बोलताना भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्याला उत्तर देताना आमदार महेश लांडगे म्हणाले, "आधी स्वतःच्या लेकाचे पराक्रम बघा. ते स्वतः आका आहेत, हे त्यांनी जाहीर करावे. मला पिंपरी चिंचवडचा आका म्हणत आहेत. मूळात अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका आहेत", अशी टीका आमदार महेश लांडगे यांनी केली.

पिंपरी चिंचवडमधील भ्रष्टाचाराचा आका संपवायचा आहे, अशी टीका अजित पवारांनी सभेत बोलताना केली होती. त्यावर महेश लांडगे म्हणाले, "सध्या अजित पवार यांचा अहंकार बोलत आहे. ते नैराश्यात आहेत."

### ...म्हणून अजित पवार भाजपासोबत आले

» अजित पवारांना भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर उत्तर देताना आमदार महेश लांडगे म्हणाले, स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी अजित पवार भाजपासोबत आले आहेत. अजित पवारांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत. मुलगा पार्थ पवारांचे पराक्रम पहा. जे स्वतःच्या काकाचे होऊ शकले नाहीत, ते पिंपरी चिंचवडचे होतील का? आमच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करायचे असतील, तर मी महापालिका प्रशासन आणि अजित पवार समोरासमोर यावं. मग सर्व उत्तरे मिळतील, असा पलटवार महेश लांडगेंनी केला.

# चाळीस हजार कोटींची कामे दाखवा; अजित पवार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना आव्हान

**पिंपरी | प्रतिनिधी**

'पिंपरी चिंचवडमध्ये २०१५-१६ ला चार हजार ८४४ कोटींच्या ठेवी होत्या. त्या आतापर्यंत दहा हजार कोटींपर्यंत जायला पाहिजे होत्या; परंतु आता फक्त दोन हजार १३२ कोटींच्या आहे. याला कोण जबाबदार आहे?" असा प्रश्न उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित केला.

तसेच '२०१७ पासून आतापर्यंत महापालिकेने ६० हजार कोटींचे अर्थसंकल्प मांडले. यात ३० ते ३२ टक्के आस्थापना खर्च झाला. तो वगळता ४० हजार कोटींची कामे कुठे झालीत? त्याचे उत्तर त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी द्यायला नको का? ते विचारण्याचा अधिकार जनतेला नाही का?' असे प्रश्नही उपस्थित करीत अजित पवार यांनी भाजपच्या स्थानिक नेतृत्वाला जाब विचारला. तसेच, 'अधिकाऱ्यांवर दबावाचे राजकारणही सुरू असल्याचे दिसत,' असल्याचा आरोपही त्यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग क्रमांक २१ मधील उमेदवार संदीप वाघेरे, डब्बू आसवानी, निकीता कदम आणि प्रियांका कुदळे यांच्या प्रचारार्थ मंगळवारी (ता. ६) पिंपरी गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पवार यांची सभा झाली. त्यात ते बोलत होते.

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती श्रीरंग शिंदे, गिरिजा कुदळे, पीसीएमटीचे माजी सभापती संतोष कुदळे, माजी नगरसेवक नाना काटे, रामआधार धारिया, विजय कापसे आदी उपस्थित होते. दरम्यान, पवार यांनी मंगळवारी तापकीर मळा चौक, शुभम गार्डन वाल्हेकरवाडी येथेही सभा घेतल्या.



पवार म्हणाले, 'पिंपरी चिंचवड शहरात विविध जाती-धर्मांचे नागरिक राहतात. शहराला मिनीभारत म्हणून ओळखले जाते. देशभरातून रोजगारासाठी लोक शहरात आले आहेत. पूर्वी लोक कामाला पिंपरीत यायचे आणि राहायला पुण्यात जायचे. त्यावेळी असा निश्चय केला, की लोक कामाला पिंपरीत आले पाहिजेत आणि राहिले पण पिंपरीत पाहिजेत. आशिया खंडातील सर्वांत श्रीमंत महापालिका म्हणून चालणार नाही; तर हे शहर देशपातळीवर उत्तम शहर म्हणून पुढे आले पाहिजे, यासाठी प्रयत्न केले.'

सर्वांना सोबत घेऊन काम केले. त्यासाठी दिलीप बंड, डॉ. श्रीकर परदेशी, आशिष शर्मा, राजेश पाटील, श्रीनिवास पाटील यांच्यासारख्या सर्वोत्तम अधिकाऱ्यांना आणले. त्यांच्या माध्यमातून शहरात विकासकामे केली."

### 'इथल्या कारभाऱ्याने काय केले?'

» '१९९२ ते २०१४ पर्यंत देशात काँग्रेसचे सरकार असतानाही आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका त्यांच्या विरोधात लढलो. आता राज्यात सरकारमध्ये असलो, तरी स्थानिक स्वराज्य संस्था वेगवेगळी लढत आहोत. २०१७ ते आतापर्यंत सत्ता त्यांच्या हाती होती. इथला जो कारभारी होता. त्याने काय कारभार केला,' असा टोला आमदार महेश लांडगे यांचे नाव न घेता लगावला. आशिया खंडामध्ये श्रीमंत असणारी महापालिका आज कर्जबाजारी झालेली आहे. याला जबाबदार कोण? मी पिंपरी चिंचवडचा विकास केला; पण कर्ज काढले नाही. एकदा आशिष शर्मा म्हणत होते की, 'दादा काहीतरी करावे लागेल.' मी म्हटले, 'अजिबात नाही.

# आमदार महेश लांडगे उतरले निवडणुकीच्या आखाड्यात!

## प्रभाग क्र. 2 मध्ये भाजपचे शक्तिप्रदर्शन; रॅलीला मिळालेला प्रतिसाद म्हणजे विजयाची नांदीच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीचा ज्वर चढू लागला असून, प्रभाग क्रमांक २ कुदळवाडी-जाधववाडी-बोऱ्हाडेवाडी-मोशी परिसरात भारतीय जनता पार्टीने जोरदार मुसंडी मारली आहे. शहराचे लोकप्रिय नेतृत्व आमदार महेश लांडगे स्वतः निवडणुकीच्या आखाड्यात उतरल्याने कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे उधाण आले आहे. मंगळवारी सायंकाळी या प्रभागात आमदार लांडगे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या भव्य प्रचार रॅलीने संपूर्ण परिसर भगवामय करून टाकला. वूड्सविले फेज टू, लक्ष्मी चौक येथून या पदयात्रेचा धडाक्यात प्रारंभ झाला. जसाजसा हा ताफा पुढे सरकला, तसतसा नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग वाढत गेला आणि एका मोठ्या जनसागराचे रूप या रॅलीला प्राप्त झाले.





स्वराज रेसिडेन्सी, प्रेस्टिन ग्रीन सोसायटी, स्वदेशा सोसायटी आणि श्रीराम चौक अशा मुख्य मार्गांवरून ही रॅली मार्गक्रमण करत असताना ठिकठिकाणी ढोल-ताशांच्या गजराने परिसर दणाणून गेला होता. ठिकठिकाणी काढलेल्या रांगोळ्यांच्या पायघड्या, फुलांची उधळण आणि 'प्रभाग २ च्या प्रगतीला चारही मते भाजपला' अशा गगनभेदी घोषणांनी प्रचारात मोठी आघाडी घेतल्याचे चित्र स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, आमदार महेश लांडगे यांनी स्वतः प्रत्येक सोसायटीत जाऊन नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या आणि त्यांच्या समस्या जाणून घेत थेट संवाद साधला. या जनसंपर्कामुळे मतदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, महिला वर्गाने ठिकठिकाणी आमदारांचे आणि उमेदवारांचे औक्षण करून त्यांना भरघोस विजयाचे शुभाशीर्वाद दिले.

भाजपाचे अधिकृत उमेदवार निखिल दादा बोऱ्हाडे ,सुजाता निलेश बोराटे, सारिका नितीन बोऱ्हाडे, राहुल गुलाब जाधव यांच्या विजयासाठी आमदार लांडगे यांनी आपली सर्व ताकद पणाला लावली आहे. या रॅलीदरम्यान पत्रकारांशी बोलताना आमदारांनी ठाम विश्वास व्यक्त केला की, हा केवळ प्रचार नसून ही विजयाची नांदी आहे. समाविष्ट गावांचा गेल्या पाच वर्षांत झालेला कायापालट, पाणीपुरवठ्याचे सक्षम जाळे, सुसज्ज रस्ते, आरोग्य सुविधा आणि महिला सक्षमीकरणासाठी राबवलेले प्रकल्प हीच भाजपची पावती आहे. येणाऱ्या काळातही या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भाजपचे हे चारही शिलेदार कटिबद्ध राहतील, असा शब्द उमेदवारांनी यावेळी मतदारांना दिला.

रॅलीच्या मार्गावर नागरिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. अनेक रहिवाशांनी "आम्ही दादांच्या शिलेदारांच्या पाठीशी ठाम आहोत आणि विकासकामांची ही परंपरा सुरू ठेवण्यासाठी कमळालाच मतदान करणार," असा निर्धार व्यक्त केला. या भव्य रॅलीमुळे प्रभाग २ मध्ये पुन्हा एकदा कमळ फुलणार, असेच वातावरण सध्या दिसून येत आहे. या प्रचार दौऱ्याने विरोधकांचे धाबे दणाणले असून, मतदारांचा कल स्पष्टपणे भारतीय जनता पार्टीच्या बाजूने झुकल्याचे या शक्तीप्रदर्शनातून अधोरेखित झाले आहे.

# राज्य निवडणूक आयुक्तांनी घेतला ऑनलाईन निवडणुकीचा आढावा

## पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुका शांततेत भयमुक्त पार पाडण्याच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी ऑनलाईन बैठकीद्वारे महापालिका प्रशासनाकडील निवडणूक तयारीचा सविस्तर आढावा घेतला. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या विविध नियोजनात्मक बाबींची माहिती यावेळी बैठकीत दिली.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ मतदान होणार असून मतमोजणी १६ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ६९१ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे असून, या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासनामार्फत सर्वंकष तयारी करण्यात आली असून याबाबत आज राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी आढावा घेतला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, आचारसंहिता कक्षप्रमुख उपजिल्हाधिकारी सुरेखा माने यांच्यासह महापालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, सहायक नगररचनाकार प्रशांत शिंपी, उपायुक्त व्यंकटेश दुर्वास, अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

बैठकीत मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया, संभाव्य दुबार मतदान टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, स्ट्रॉंग रूमची सुरक्षित व्यवस्था, मतमोजणी केंद्रांची आखणी, तसेच निवडणूक कालावधीत माहिती संकलन व प्रसारासाठी स्थापन करण्यात आलेल्या मीडिया सेलच्या कार्यपद्धती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण प्रक्रिया सुरू असून, उमेदवारांच्या निवडणूक खर्च तपासणीची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. तसेच मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मतदान जनजागृती कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यासोबत नियमित बैठकांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

मतदारांच्या तक्रारींच्या तात्काळ निवारणासाठी तक्रार निवारण केंद्र, तसेच प्रसारमाध्यमांमधील जाहिराती व बातम्यांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रसार माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती (एमसीएमसी) प्रभावीपणे कार्यरत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. याशिवाय, ईव्हीएम मशीनसाठी आवश्यक साहित्य, पोस्टल बॅलेट मतदानाची व्यवस्था, मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था तसेच सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून निगराणी ठेवण्याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

# महापालिका निवडणूक; प्रचारात रील्सची धूम

## हिंदी-मराठी गीतांवर 5 ते 10 रील्स; तरुण मतदारांना भुरळ घालण्यासाठी सोशल मीडियाचा फुल वापर

**पुणे | प्रतिनिधी**

'संकल्प बोलके हम तो निकल पडे... विजयी भव, 'आपलीच हवा...', 'लढ रे तू बळीराजा...', 'दंगल दंगल...', 'लक्ष्य तो हर हाल में पाना है...', 'तू चाल पुढं, तुला रं गड्या भीती कशाची...' अशा विविध गीतांवर प्रचारांचे रील्स आपण इन्स्टाग्राम अन् फेसबुक पाहताना नजरेस पडलेच असतील... कारण उमेदवारांच्या प्रचारांच्या रील्सची सोशल मीडियावर धूम असून, हिंदी-मराठी अन् अगदी दाक्षिणात्य चित्रपटातील गीतांवरील रील्सची सध्या हवा आहे.

महापालिकेच्या निवडणुकांमध्ये प्रचारासाठी रील्सचा फंडा सर्वाधिक वापरला जात असून, उमेदवारांच्या सोशल मीडिया टीमकडून दिवसभरात सुमारे पाच ते दहा रील्स अपलोड केले जात आहेत. प्रचारफेरी, सभा, मतदारांशी भेटगाठी, मोहिमांच्या विविध गीतांवरील रील्सची चलती आहे. विधानसभा निवडणुकांमध्ये उमेदवारांकडून इन्स्टाग्राम, फेसबुक आणि यू-ट्युबवर प्रचारासाठी रील्सचा फंडा सर्वाधिक वापरण्यात आला, हेच चित्र महापालिकेच्या निवडणुकांमध्येही पाहायला मिळत आहे. इन्स्टाग्राम, फेसबुकवर रील्सची चलती असून, रील्सद्वारे उमेदवारांचा दमदार प्रचार केला जात आहे.

प्रत्येक प्रभागांतील विविध पक्षांचे उमेदवार रील्सच्या माध्यमातून प्रचार करण्यावर भर देत आहेत. खासकरून तरुण मतदारांपर्यंत पोचण्यासाठी रील्सचा वापर केला जात असून, ट्रेंडिंग गीतांवर 30 सेकंद ते एक मिनिटांचे रील्स अपलोड केले जात आहेत. अशा रील्सला हजारो व्ह्यूजही मिळत आहेत. उमेदवारांचे रील्स शूट करण्यासाठी चार जणांची टीम काम करत आहे. त्यात दोन व्हिडीओग्राफर, एडिटर आणि सोशल मीडिया एक्स्पर्टचा समावेश आहे. प्रचारफेरीपासून ते मतदारांच्या भेटीगाठीपर्यंतचे व्हिडीओ शूट करून, व्हिडीओचे एडिटिंग करून, त्या व्हिडीओत गीताचा समावेश करून रील्स तयार करण्यात येत आहेत आणि हे रील्स सोशल मीडियावर अपलोड केले जात आहेत.

याविषयी सोशल मीडिया एक्स्पर्ट मयूर हुडे म्हणाले, प्रत्येक निवडणुकीत ट्रेंड बदलत असतो. महापालिकेच्या निवडणुकीतही सर्वाधिक ट्रेंड आहे तो रील्सद्वारे केल्या जाणाऱ्या प्रचाराचा. उमेदवारांच्या प्रचारासाठी रील्सचा सर्वाधिक वापर केला जात आहे. मीही काही उमेदवारांसाठी रील्स तयार करण्याचे काम करीत आहे. उमेदवार ज्या प्रभागात निवडणुकीसाठी उभे आहेत त्या प्रभागाचे वैशिष्ट्य सांगणारे, उमेदवारांच्या विकासांपासून ते त्यांची माहिती देणाऱ्या थीमवर रील्स तयार करण्यात येत आहेत.




### प्रत्येक रीलसाठी खास गीते अन् टॅगलाईनची निवड

» उमेदवारांच्या प्रचारांच्या रील्स हिंदी, मराठी आणि दक्षिणात्य चित्रपटातील फेमस गीतांवर तयार केले जात आहेत. धुरंधर चित्रपटात अक्षय खन्ना यांनी ज्या गीतावर एंट्री केली आहेत, त्या गीतावरील रील असो वा आया रे तुफान... या गीतावरील रील्स... अशा ट्रेंडिंग गीतांवरील प्रचारांचे रील्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालत असून, रील्सला दिलेल्या टॅगलाईनही लक्ष वेधून घेत आहे. जनतेची साथ, विकासाची वाट..., माता-भगिनींचा निर्धार पक्का... या चिन्हावर मारा शिक्का... अशा विविध टॅगलाईनही गाजत आहेत.

### प्रचाराचे विविध फंडे

» महापालिका निवडणुकांमध्ये प्रचारासाठी सोशल मीडियाचा पुरेपूर वापर केला जात आहे. उमेदवारांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटसह राजकीय पक्षांच्या अकाउंटवरूनही प्रचार करण्यात येत आहे. विशेष म्हणजे प्रचारासाठीची छायाचित्रे, या पोस्टसाठी वापरलेले गीत आणि पोस्टरही पसंतीस उतरत आहेत. हात जोडून मतदारांना नमस्कार करणारे, मतदारांशी संवाद साधणारे, अशा विविध स्टाईलमधील उमेदवारांच्या छायाचित्रांचा सोशल मीडियावर बोलबाला आहे.

### प्रचारासाठी रील्सचा सर्वाधिक वापर

» सोशल मीडिया एक्स्पर्ट मयूर हुडे म्हणाले, प्रत्येक निवडणुकीत ट्रेंड बदलत असतो. महापालिकेच्या निवडणुकीतही सर्वाधिक ट्रेंड आहे तो रील्सद्वारे केल्या जाणाऱ्या प्रचाराचा. उमेदवारांच्या प्रचारासाठी रील्सचा सर्वाधिक वापर केला जात आहे. मीही काही उमेदवारांसाठी रील्स तयार करण्याचे काम करीत आहे. उमेदवार ज्या प्रभागात निवडणुकीसाठी उभे आहेत त्या प्रभागाचे वैशिष्ट्य सांगणारे, उमेदवारांच्या विकासांपासून ते त्यांची माहिती देणाऱ्या थीमवर रील्स तयार करण्यात येत आहेत. रील्ससाठी ट्रेंडिंग गीते निवडत आहोत आणि ट्रेंडिंग गीतांवरील रील्स गाजत आहेत. दिवसभरात तीन ते पाच रील्स अपलोड करत आहोत.

# नातेवाईकांकडून डिपॉझिटची रक्कम भरून घेणे भोवले; पुण्यातील 76 खासगी रुग्णालयांना नोटिसा

## मोफत उपचार असूनही डिपॉझिट व अतिरिक्त शुल्क; आरोग्य विभागाचा कारवाईचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

आयुष्मान भारत-महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातील तब्बल 76 खासगी रुग्णालयांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. योजनेअंतर्गत मोफत उपचारांची तरतूद असताना काही रुग्णालयांनी नातेवाईकांकडून डिपॉझिटची रक्कम भरून घेणे, आवश्यक तपासण्या बाहेरील प्रयोगशाळेत करून आणण्यास भाग पाडणे, तसेच इम्प्लांटसाठी अतिरिक्त पैसे मागितल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्या होत्या. त्यानंतर ही कारवाई केली आहे. त्यापैकी 5 रुग्णालयांकडून एकूण बिलाच्या पाच पट रक्कम आकारून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

महात्मा फुले योजनेत समाविष्ट असलेल्या बारामतीतील एका रुग्णालयात एक रुग्ण मेंदूला गंभीर दुखापत झाल्यामुळे उपचारांसाठी दाखल झाला. सुरुवातीला त्याच्यावर उपचार करण्यात आले. त्यासाठी सुमारे 3 लाख रुपयांचे बिल आकारण्यात आले. त्यानंतर रुग्णाला ससून रुग्णालयात हलवण्यास सांगण्यात आले. या कालावधीत रुग्णाचा मृत्यू झाला. रुग्णाच्या नातेवाईकांनी तक्रार केली असता, वस्तुस्थितीची पडताळणी करण्यात आली. त्यानुसार, रुग्णालयाला नोटीस पाठवून 15 लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. त्यापैकी 3 लाख रुपये रुग्णाच्या नातेवाईकांना परत करण्यात आले.

आयुष्मान भारत-महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत राज्य शासनाने प्रत्येक कुटुंबाचा 5 लाख रुपयांचा विमा उतरवला आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी आतापर्यंत उत्पन्न आणि रेशन कार्डाची मर्यादा होती. आता जिल्ह्यातील कोणत्याही उत्पन्न गटातील नागरिकाला योजनेचा लाभ घेता येणे शक्य आहे. कागदपत्रांची पूर्तता केल्यास रुग्णांना 5 लाखांपर्यंतचे उपचार मोफत मिळणार आहेत. योजनेत आतापर्यंत जिल्ह्यातील 68 रुग्णालयांचा समावेश होता. आता ही संख्या 206 पर्यंत वाढवली आहे. योजनेअंतर्गत 1356 प्रकारचे उपचार मोफत पुरवण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, योजनेच्या पॅनलवरील काही रुग्णालयांकडून योजनेच्या अटी-शर्तींचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. योजनेअंतर्गत उपचार पूर्णतः मोफत असताना काही रुग्णालये अप्रत्यक्षपणे रुग्णांकडून आर्थिक भरपाई उकळत असल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.




> "आयुष्मान भारत- महात्मा फुले योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या रुग्णालयांमध्ये रुग्णांना सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यास 5 लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत केले जातात. रुग्णालयांनी रुग्णाकडून डिपॉझिट घेणे, इम्प्लांटसाठी पैसे मागणे, तपासण्या बाहेरुन करण्यास सांगणे अशा तक्रारी आल्यास कारवाई केली जाते.
>
> - डॉ. वैभव गायकवाड, जिल्हा समन्वयक, महात्मा फुले जनआरोग्य योजना.

# घरपोच सेवा महागली... जादा रुपये मोजावे लागणार

## परिवहन विभागाकडून टपाल विभागामार्फत परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र घरपोच मिळण्यासाठी आता सेवा शुल्कात वाढ करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

परिवहन विभागाकडून टपाल (पोस्ट) विभागामार्फत परवाना (लायसन्स) आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी बुक) घरपोच मिळण्यासाठी आता सेवा शुल्कात वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार परवाना किंवा वाहन नोंदणी प्रमाणपत्र घरपोच देण्यासाठी ५८ रुपयांऐवजी ७० रुपये द्यावे लागणार आहेत. एक जानेवारीपासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असल्याने नागरिकांच्या खिशाला आता झळ बसणार आहे.

राज्याच्या परिवहन विभागामार्फत वाहन चालकाने चाचणी दिल्यानंतर तसेच नवीन वाहन घेतल्यानंतर परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र संबंधित व्यक्तींना घरपोच पाठविण्यात येते. त्यासाठी परिवहन विभागाने टपाल विभागाबरोबर सामंजस्य करार केला आहे. दरवर्षी या कराराचे नूतनीकरण करण्यात येते. त्यानुसार टपाल विभागाकडून या सेवेसाठी १८ टक्के वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आकारला जातो. त्यामुळे परिवहन विभागाकडून या सेवेसाठी नागरिकांकडून प्रत्येकी ५८ रुपये आकारले जात होते. टपाल विभागाने स्थानिक (जिल्ह्यातील) आणि गैरस्थानिक (जिल्ह्याबाहेरील) असे दोन दर आकारणीबाबत परिवहन विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता.

या प्रस्तावाला परिवहन विभागाने मान्यता दिली आहे. त्याची अंमलबजावणी एक जानेवारीपासून सुरू करण्यात आली आहे. याबाबत परिवहन विभागाने परिपत्रक काढले आहे. त्यामुळे आता नागरिकांना परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी ५८ रुपयांऐवजी ७० रुपये मोजावे लागणार आहेत

घरपोच सेवेसाठी दरवाढ केल्यामुळे पक्क्या परवान्यासाठी ७७० रुपये (जुने दरानुसार ७५८), नुतनीकरण केलेल्या परवान्यासाठी ४७०(जुन्या दरानुसार ४५८) रुपये आणि दुचाकी चारचाकी एकत्र परवान्यासाठी १,०७० रुपये मोजावे लागणार असून एक ऑक्टोबर २०२५ पासून ज्या नागरिकांनी वाहने घेतली आहेत, पक्के परवाने किंवा नुतनीकरण केले आहे, त्यानुसार एक जानेवारीपासून वाढीव शुल्कानुसार आकारणी करावी असे निर्देश दिले आहेत.




### असा मध्यम मार्ग

» परिवहन विभागाच्या घरपोच सेवेसाठी दरवाढ केल्यामुळे पक्क्या परवान्यासाठी ७७० रुपये (जुने दरानुसार ७५८), नुतनीकरण केलेल्या परवान्यासाठी ४७०(जुन्या दरानुसार ४५८) रुपये आणि दुचाकी चारचाकी एकत्र परवान्यासाठी १,०७० रुपये मोजावे लागणार असून एक ऑक्टोबर २०२५ पासून ज्या नागरिकांनी वाहने घेतली आहेत, पक्के परवाने किंवा नुतनीकरण केले आहे, त्यानुसार एक जानेवारीपासून वाढीव शुल्कानुसार आकारणी करावी असे निर्देश दिले आहेत.

### असे शुल्क मोजावे लागणार

» परिवहन विभागाच्या घरपोच सेवेसाठी दरवाढ केल्यामुळे पक्क्या परवान्यासाठी ७७० रुपये (जुने दरानुसार ७५८), नुतनीकरण केलेल्या परवान्यासाठी ४७०(जुन्या दरानुसार ४५८) रुपये आणि दुचाकी चारचाकी एकत्र परवान्यासाठी १,०७० रुपये मोजावे लागणार असून एक ऑक्टोबर २०२५ पासून ज्या नागरिकांनी वाहने घेतली आहेत, पक्के परवाने किंवा नुतनीकरण केले आहे, त्यानुसार एक जानेवारीपासून वाढीव शुल्कानुसार आकारणी करावी असे निर्देश दिले आहेत.

### असे शुल्क मोजावे लागणार

» पूर्वीचे टपाल शुल्क – ५८ रुपये जीएसटीसह
» नवीन टपाल शुल्क – ७० रुपये जीएसटीसह
» एकूण वाढ – प्रती सेवा १२ रुपयांची

> परिवहन विभागाच्या निर्देशानुसार नागरिकांना घरपोच देण्यात येणाऱ्या सेवांच्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे.
>
> - स्वप्निल भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.

# अजित पवारांविरोधात बारामतीत भाजप रस्त्यावर; जनक्षोभ मोर्चात केले गंभीर आरोप

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या 'राक्षसी भूक' विधानाचा भाजप कार्यकर्त्यांकडून तीव्र निषेध; बारामती शहरात जनक्षोभ मोर्चा काढून जाहीर माफीची मागणी.

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाबाबत करण्यात आलेली अवमानकारक विधाने, बारामती तालुक्यातील राजकीय मक्तेदारी, भ्रष्ट कारभाराच्या निषेधार्थ सोमवारी भारतीय जनता पक्ष बारामती शहर व तालुक्याच्या वतीने शहरात जनक्षोभ मोर्चा काढण्यात आला. त्यासाठी भाजप कार्यकर्ते आज रस्त्यावर उतरले होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भारतीय जनता पक्षाचा राक्षसी भूक असा उल्लेख करून कोट्यवधी कार्यकर्त्यांचा अपमान केला आहे.

कार्यकर्त्यांनी आंदोलनादरम्यान बकासुराचे नैवेद्य ताट दाखवून अनोख्या पद्धतीने निषेध केला. पक्षाचा अपमान करणारांचा निषेध असो, बकासुर प्रवृत्तीचा निषेध असो, अजित पवार महायुतीतून बाहेर पडा, माफी मागा, माफी मागा, अजित पवार माफी मागा, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.प्रशासनाने निवेदनाची दखल घेऊन ७ दिवसांच्या आत कारवाई न केल्यास, संपूर्ण तालुक्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी भाजपचे नवनाथ पडळकर, सतीश फाळके, अँड. नितीन भामे, सुजित वायसे, शहाजी कदम, मुकेश वाघेला, प्रमोद डिंबळे, संगिता दामोदरे, अँड. माया खुंटे, गौरी एकशिंगे, सुनिता शिंदे, प्रियांका साळुंखे, कांताबाई गाडी, इंदुबाई चौधर, सुवर्णा जगताप, संतोष जाधव, फिरोज उर्फ मुन्ना तांबोळी, साजन अडसुळ, चंद्रकांत सरोदे, अँड. आकाश दामोदरे, अँड. अक्षय गायकवाड, रघु चौधर, अल्ताफ बागवान, अजित जाधव, अभिजीत पवार, उमेश गायकवाड,ओंकार साठे, महेश नेटके, बाळासाहेब गर्डी, विवेक साळुंखे, रोहित शिंदे, अमोल प्रभुणे, संतोष सरोदे, ओंकार एकशिंगे यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### निवेदनातील मागण्या

» जाहीर माफीची मागणी: जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाचा अपमान करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी भारतीय जनता पक्षाची व कार्यकर्त्यांची जाहीर माफी मागावी.
» कथित जमीन व्यवहारांची चौकशी: पवार यांच्याशी संबंधित बारामती परिसरातील जमीनींचे बाजारमूल्य कोट्यवधी असतानाही, नोंदणीवेळी अत्यल्प किमती दाखवून शासनाचा महसूल बुडवल्याचा संशय आहे. या व्यवहारांची तात्काळ निष्पक्ष चौकशी व्हावी.
» तथाकथित 'मलिदा गँग'चा बंदोबस्त: बारामतीतील टेंडर प्रक्रिया आणि शासकीय कंत्राटांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या तथाकथित 'मलिदा गँग'ची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) चौकशी करण्यात.